# अमरावती शहर दैनंदीन गुन्हे अहवाल दि.०१/०३/२०२३

## विनयभंग :—

| अ.क्र. | पो.ठाणे<br>गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ता.वेळ<br>माहीती ता वेळ<br>गुन्हा दा. ता.वेळ | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ५ | ७ | १० |
| १ | पोस्टे गाडगेनगर अपक्र २७४/२३ कलम ३५४, ३५४ड भादवी सहकलम ८/१२ पोक्सो | दि.२८.२.२३ चे १४ .०० वा दरम्याा<br><br>दि.२८.२.२०२३ चे १७.५२ वा | चेतन संजय नागदीवे वय २२ वर्ष रा. चिंचखेड पो स्टे माहूली जहागीर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतावेळी व ठीकाणी यातील आारोपी हा नेहमी नेहमी पिडीत फीर्यादी हीचे मागे लागून पाठलाग करुन त्रास देतो दि. २८.०२.२०२३ रोजी गाडगे महाराज समाधी मंदीरात फीर्यादी आपल्या तिन मैत्रीण सोबत जेवणाचे डब्बे खात होत्या त्यानंतर होमवर्क करीत असताना आरोपी चेतन नागदीवे हातात गुलाबाचे फुल आणून तु माझेशी लग्न कर मी तुझ्यावर प्रेम करतो. मी तुझे नाव माझ्या हातावर गोंदले असे बोलून माझा हात पकडून मला लज्जा येईल असे कृत्य केले मी ओरडली तेव्हा लोक जमा झाले व त्याला मारहाण करीत असताना त्याच वेळी पोलीसांची जिप तेथे आली व त्यास पकडून नेले. मी घाबरल्यामुळे मी माझ्या वडीलांना व मोठ्या बहीणीला फोन करुन बोलाविले व पो स्टे ला रिपोर्ट दिल्यास आली कार्यवाही व्हावी यापुर्वी चेतन नागदीवे यांचेवर विनयभंगाचा गुन्हा दाखल आहे माझी मोठी बहीणी फीर्यादी आहे अश्या फि चे जबाणी रिपोर्ट वरु सदरचा गुन्हा दाखल |

## घरफोडी :—

| अ.क्र. | पो.ठाणे<br>गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ<br>माहीती ता वेळ<br>गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | बडनेरा अप.नं. १६८/२३ कलम ४५४, ४५७, ३८० | अमरावती. | घटना ता. वेळ दि. ०५.०२.२३ चे ०९.०० वा ते दि. २६.०२.२३ चे १६.०५ वा. | एक महिला | अज्ञात. | हकीकत अशाप्रकारे आहे की, फिर्यादी यांनी आज रोजी पो.स्टे. ला येऊन जबानी रिपोर्ट दिला की, ते दि. ०५.०२.२३ रोजी सकाळी ०९.०० वा. घराला कुलुप लावुन मुलीच्या घरी नागपुरला गेल्या होत्या. तेथुन दि. ०७.०२.२३ रोजी इटारसी येथे नातेवाईकांकडे लग्नाकरित गेल्या होत्या. दि. २६.०२.२३ रोजी दुपारी १६.०५ वा. शेजारी राहणारे यांनी फिर्यादीस तुमच्या घरी चोरी झाल्याबाबत फोन करून माहीती दिली. वरून |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | भा.दं.वि | | माहीती वेळ - दि. २८.०२.२३ चे १७.०० वा.<br>दाखल ता. वेळ - दि. २८.०२.२३ चे १९.२१ वा. | | | फिर्यादी या दि. २७.०२.२३ रोजी घरी आल्या असता त्यांना घराच्या बेडरूममध्ये असलेल्या लोखंडी कपाटाच्या लॉंकर मध्ये ठेवलेले १)सोन्याचे मंगळसुत्र ३५ ग्रॅम, कि. अं. १,०५,०००/- रू. २) सोन्याचे कानातील झुमके दोन जोड १५ ग्रॅम, कि. अं. ४५,०००/- रू., ३) सोन्याची नाकातील नथ ४ ग्रॅम, कि. अं. १२,०००/- रू., ४) मुलाची सोन्याची अंगठी १० ग्रॅम, कि.अं. ३०,०००/- रू. ५) सोन्याचे डोरले १० ग्रॅम, कि. अं. ३०,०००/- रू. असे सोन्याचे दागिने व चांदीचे तोरड्या, लक्ष्मीमुर्ती, गणपती मुर्ती, इत्तरदानी, लहान बाळाचे कपडे असे ५० ग्रॅम चांदी, कि. अं. ५०००/- रू., असा एकुण २,२७,०००/- रू. चा मुद्देमाल दिसुन आला नाही. नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीच्या घरात प्रवेश करून कपाटातील २,२७,०००/- रू. चे दागीने चोरून नेले. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल |

## वाहनचोरी :—

| अ.क्र . | पो.ठाणे<br>गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ<br>माहीती ता वेळ<br>गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| २ | पो.ठाणे .सिटि कोतवाली अमरावती शहर अप क्र ९७/२३ कलम ३७९ भादवी | चित्राचौकातील नाफेड खरेदी विक्री कार्यालय समोर अमरावती | गुन्हा घ ता वेळ दि.२७.०२.२०२३ चे १२.३० वा<br>माहिती मिळाली दि.२८.०२.२०२३ चे १२.०० वा<br>दाखल ता वेळ दि.२८.०२.२०२३ चे १३.५९ वा | रामकृष्ण शिवरामजी बोबडे वय ५५ वर्ष धंदा- शेती रा.कामनापुर ता भातकुली जि अमरावती | अज्ञात | हकिकत अशा प्रकारे आहे की, नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे आपली मोटर सायकल स्प्लेन्डर मोटर सायकल क्र.MH27 BG 8651 जुनी वापरती कि.अं. २५,०००/-रु.इंजिन नंHA10EREHK57259 चेचिस नं. MBLHA10BFEHK08043 हि चित्रा चौकातील नाफेड खरेदी विक्री कार्यालयासमोर अमरावती येथे उभी करुन फिर्यादी हे नाफेड कार्यालयात गेले असता त्याचे काम करुन परत आल्यावर त्याची गाडी ठेवलेल्या ठिकाणी दिसुन आली नाही आजुबाजुला आजपावेतो शोध घेतला मिळुन आली नाही ती कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली .अशा फिर्यादी च्या जबानी रिपोर्ट वरुन व डि ओ सा योंच आदेशाने सदरचा गुन्हा दाखल |

## चोरी :—

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पोस्टे सिटी कोतवाली अप क्र. ९८/२३ कलम ३७९ भादवि | बस डेपो अमरावती | गुन्हा घडला ता.वेळ दि. २८/०२/२३० चे ११.३० वा माहीती ता वेळ १७.३० वा. गुन्हा दा. ता.वेळ२८/०२/२३ चे १८.०७ वा | प्रकाश मधुकर अळसपुरे वय ४७ वर्ष धंदा मजुरी रा. दिपा हॉस्पीटल जवळ अमरावती. | अज्ञात | हकीकत आश्या प्रकारे आहे की नमुद घ. ता वेळी यातील फिर्यादी हे त्याचा मामे भाई संजय रामचंद्र भेडे यांचे सोबत लग्नाकरीता वरुड येथे जाणेकरीता बस डेपो अमरावती बस मध्ये चढत असताना फिर्यादी यांचे पटच्या खिशातुन त्याचा OPP कंपनाचा काळ्या रंगाचा मोबाईल,ज्याचा IMEI NO. १) ८६२०५००५८६३९९१७, २)८६२०५००५८६३९९०९ जुना वापरता कि.अंदाजे १२,०००/-रु. चा मोबाईल कोणीतरी अज्ञात ईसमाने चोरुन नेला अशा फिर्यादीच्या जबानी रि. वरुन व डि. वो. सा याचे आदेशाने सदरचा गुन्हा दाखल |

अपघात :—

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | जखमीचे नाव | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | ९ | १० |
| १ | पोस्टे राजापेठ २१०/२०२३ कलम २७९, ३३७, ४२७ भादवि | बेनाम चौक | २७.०२.२०२३ चे १७.३० वा दरम्यान<br><br>दि, २८/०२/२०२३ चे २२.१३ वा | एक महिला | ग्रे रंगाची चारचाकी क्र एमएच १५ जि एल ६४९४ चा चालक | एक महिला | हकीकत अश्या प्रकारे आहे कि यातील फिर्यादी ही तिची गाडी मोपेड ने बेनाम चौक ते बडनेरा कडे जात असतांना बेनाम चौक येथे एक ग्रे रंगाची चारचाकी क्र एमएच १५ जि एल ६४९४ चा चालकाने त्याचे वाहण भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फी चे वाहणास मागुन धडक दिली त्यामुळे फी खाली पडली व फी ला पाठीला मुका मार लागला व गाडीची मागील बाजु चपकली व २००० रु चे नुकसान झाले अश्या फिर्यादी जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पोस्टे सिटी कोतवालीअप क्र. ९९/२३ कलम २७९, ३३७ भादवि | कॉटन मॉर्कटच्या मागील बाजुचे गेट | गुन्हा घडला ता.वेळ दि. २८/२/२०२३ चे २०.०० | यश हरिचंद साहु वय २६ वर्ष रा. रतनगंज नागोबा | टाटा इंट्रा क्र. MH २७ BX ५९३६ चा चालक | यश हरिचंद साहु वय २६ वर्ष व त्याची | हकीकत आश्या प्रकारे आहे की नमुद घ. ता वेळी यातील फिर्यादी हे त्याच्या आईला त्याची दुचाकी MH २७ AL०४६४ ने आदर्श हॉटेल कडुन घेईन धर्मदाय कॉटन फंड कडे जात होता तेवढ्यात झेनित हॉस्पीटल कडुन विलास नगर कडे जाणा-या रस्त्याने |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाला अमरावती | माहीती ता वेळ दि. २८/२/२०२३ चे २०.१५<br>गुन्हा दा. ता.वेळदि २८/०२/२०२३ चे २१.२४ वा | मंदीरा जवळ अमरावती | | आई | एक चारचाकी टाटा इंट्रा क्र. MH २७ BX ५९३६ चा चालकाने अतिशय निष्काळजीपणे वाहन चालवुन फिर्यादीच्या दुचाकीला धडक दिली त्या अपघातामध्ये फिर्यादी व त्याची आइ जख्मी झाले फिर्यादीच्या आईला मार असल्याने त्याना बाहेती हॉस्पीटल येथे नेवुन उपचार सुरु आहे सदर अपघातामध्ये फिर्यादीच्या डाव्या हाताला व पायाला किरकोळ मार लागला अशा फिर्यादीच्या जबानी रि वरुन व मेडीकल सर्टिवरुन तसेच डि. वो, सा. यांचे आदेशाने सदरचा गुन्हा दाखल |

## इतर :—

| अ.क्र. | पो.ठाणे<br>गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ<br>माहीती ता वेळ<br>गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| २ | गाडगेनगर अमरावती<br><br>अपक्र.२७५/२३ कलम-१४३, ४४७, १८८ भादवी ,सहकलम १३५ मपका | नियोजन भवन जिल्हाअधिकारी कार्यालय | घतावेळ दि.२८/२/२३ च १२.०० ते १२.००पर्यत<br><br>दाखल तावेळ दि.२८/२/२३ चे १९.५५ वा | पोनी रेखा लोढे मॅडम पोलीस स्टेशन गाडगेनगर अम शहर | १.सागर प्रमोदराव देशमुख यूवा सेना विभागिय सचिव वय-३७ रा.गाधीचौक अम. २.राहूल रामकृष्ण माकोडे ३७ अंबाविहार अम. ३.शैलेश विजयराव चौहान ४५ शिवाजानगर चौरे नगर ४.स्वराज धनंजय ठाकरे ३१ शारदा नगर ५.रूषीराज सूनिल काकडे ३२ साई नगर ६.मयूर विलासराव गव्हाने २८ टेलीकॉम कॉलणी ७.श्रीनिवास हिम्मतराव सरडे ४० खरपी भातकूली ८.उमेश प्रल्हादराव शहाने ३१ मोर्शि ९.अमन शितल मिश्रा २१ शिवाजी नगर १०.सतोष चिरकूटराव शेळ्के २५ चौरे नगर ११.सुजित राजन झंजाळ ३० नवीवस्ती बडणेरा १२.शक्ती ऊर्फ सिद्धार्थ भले २३ चौरे नगर १३.वैभव कृष्णराव मोदकार ३४ श्रीकृष्णपेठ १४.प्रजव्वल विरेंद्र श्रीखंडे २३ अंबा विहार १५.रोहीत गजानन जगताप २३ रवि नगर अंबा विहार १६.सूमित राजेंद्र राऊत २७ खरबी भातकूली १७.पंकज रमेशराव फूके ४० अंबा विपार १८.निलेश दशरथ पटेल २४ शिवाजी नगर १९.सोहान गणेश निस्ताने ३५ | हकीकत अशाप्रकारे आहे की यातील घटऩा तारीख वेळ् व ठीकाणी यातील आरोपीतांनी जिल्हाअधिकारी कार्यालय नियोजन भवनचे मागील भिंतीवरून बेकायदेशीरपने ऊड्यामारून धावत कार्यालय नियोजन भवनाच्या समोर येवून पोलीसाच्या सूचनाचे उल्लघन करून नियोजन भवनाच्या आतील कार्यालयामध्ये प्रवेश करून घोषणाबाजी केल्याने व म.पो .आयुक्त यांचे अधिसुचना कलम ३७(१)(३) म.पो.का.चे उल्लघन करून विनापरवाना शिवसेना उद्धव ठाकरे गट यूवा सेनेतर्फे पालकमंत्री विरोधात आंदोलन केल्याने आरोपीतांना विरूद्ध गून्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | शिरजगाव मोर्शि | |
| ३ | पोस्टे राजापेठ २०९/२०२३ कलम ३४१, ३५२, २९४, ५०६ब, ५०४, ३४ भादवि | केडीया नगर चौक अमरावती | २८.०२.२०२३ चे १४/३० वा दरम्यान<br><br>दि, २८/०२/२०२३ चे १९.१४ वा | दादु उर्फ क्रुपाल दिपक जांभुळकर वय २४ धंदा ड्रायव्हर रा सुशिल नगर गुनवंतबाबा मंदीर जवळ | १.आकाश उर्फ गंगु मोरे २.करण विटो-या ,<br>३.सोनु चावरे<br>४.रोहीत मांडळे रा केडीया नगर चौक अमरावती | हकीकत अश्या प्रकारे आहे कि नमुद घ ता वेळी व ठीकाणी आज दि २८/२/२३ रोजी दुपारी ०२.३० वा दरम्यान फीर्यादी मोटर सायकलीने मोबाईल आणण्या करीता घरुन कंवर नगर येथे जात असतांना केडीया नगर चौक अमरावती येथे फी यास आरोपी नामे आकाश उर्फ गंगु मोरे व त्यांचे सोबत करण विटो-या , सोनु चावरे , रोहीत मांडळे यांनी फीस अडवीले त्यापैकी आरोपी करण विटो-या याने फीस शिवीगाळ करुन जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या तसेच आरोपी सोनु चावरे याने फी स अश्लिल शिवीगाळ करुन फी चे अंगावर धावुन आला त्यामुळे फी मोटार सायकल घेवुन पळाला असता त्यांनी मोसाने फीचा राजापेठ अंडरब्रिज पर्यंत पाठलाग केला अश्या फिर्यादी जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ५ | पो. स्टे कोतवाली अप क्र.१००/२३ कलम १२२ मपोका | शिवाजी मार्कट बस डेपो अमरावती | गुन्हा घडला ता.वेळ दि. २८/०२/२०२३ चे २३.०० वा<br>माहीती ता वेळ दि. २८/०२/२०२३ चे २३.१०<br>गुन्हा दा. ता.वेळदि. २८/०२/२०२३ चे | प्रोपोउपनि रवि झ ाकर्डे पो. स्टे कोतवाली | मयुर किशोर सोळके वय १८ वालकट कंपाईड अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, फिर्यादी प्रो पोउपनि झाकर्डे यांची पो.स्टे सा २१.०० ते ०९.०० वा डि.वो ड्युटी असताना पो स्टे हदादीत नाईट पेट्रोलिंग ड्युटी असल्याने आम्ही व पो स्टाप सपोउपनि४६९,पो का ६४६,१७४४, ,१५५५. असे नाईट पेट्रोलिंग ड्युटि दि.२८.०२.२०२३ चे २३.०० वा करीत असताना शिवाजी मार्कट बस डेपो अमरावती परिसरात गुप्त बातमीदारा कडुन खात्रीलायक बातमी मिळाली की एक इसम हा शिवाजी मार्कट बस डेपो अमरावती परिसरात फिरत आहे वरुन आम्ही व सोबत पंचनाम्यातील पंच घेऊन सरकारी वाहनाने २३.१० पोहचलो वरील हा शिवाजी मार्कटच्या गल्ली बोळात फिरताना दिसुन आला त्यास इशारा देऊन त्याचे नाव गाव विचारले सता त्याने वरील प्रमाणे सांगीतले सदर संशयित हा संशईतरित्या हालचाली करीत असतांना दिसुन आला त्यावरुन त्याला रात्रीचे अंधारात उभा राहन्याचे कारन विचारले असता त्याने कोनतेही समाधानकारक उत्तर न देता उडवाउडविचे उत्तर दिले वरुन सदर ईसम हा सदर परिसरात चोरी सारखा दखलपात्र गुन्हा करन्याचे उद्देशाने फिरत असल्याचे निशपन्न झाल्याने त्याचे विरुध्द कलम १२२ म पो का प्रमाने सदरचा गुन्हा दाखल |

प्रोव्हीबीशन -

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| ३ | पो.स्टे. फ्रेजरपुरा अमरावती शहर | अप क्र.७१/२०२३ कलम ६५(ई) मदाका | चपराशीपुरा रद्दीपुरा सार्वजनिक ठिकाणी अमरावती | दि.२८/०२/२०२३ चे २१.१५ वा | दि.२८.०२.२०२३ चे २२.५७ वा | - नापोकॉ महेंद्र वलके ब.नं. १३८१ पो.स्टे. फ्रेजरपुरा अमरावती शहर | प्रल्हाद रामभाउ गुडधे वय ६० वर्ष, रा. चपराशीपुरा रद्दीपुरा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे पो.स्टाफ सह पो.स्टे. ला हजर ड्युटी असतांना गुप्त बातमीदाराकडु माहीती मिळाली की, एक इसम हा एका चपराशीपुरा रद्दिपुरा येथे झेंडाजवळ दारु विक्री करित आहे अशा माहीतीवरुन दोन पंचाना चपराशीपुरा माजी राष्ट्रपती बंगला येथे बोलावुन सदर मिळालेल्या माहीवतीवर जावुन लपुछपुन पाहणी केली असता एक इसम हा पिशवीत मधुन देशी दारु काढुन लोकांना विक्री करतांना दिसुन आल्याने त्यास पंचा समक्ष ताब्यात घेवुन त्याचे नाव, गाव विचारले असता त्याने वरिल प्रमाणे सांगीतले व त्याचे ताब्यातुन जप्तीपंचनाम्या प्रमाणे १५ नग बॉबी संत्रा देशी दारुच्या ९० मीली च्या पावट्या प्रत्येकी ३५/- रु. प्रमाणे ५२५/- रु चा मुद्देमाल तसेच एकुण १५ नग देशी दारुच्या टॅगोपंच ९० मीली च्या पावट्या प्रत्येकी ३५/-रु. प्रमाणे प्रत्येकी ५२५/- रु. चा मुद्देमाल असा एकुण १०५०/-रु. चा प्रोव्ही माल मिळुन आल्याने सदर मुद्देमाल बारकाईने पाहणी केली असता त्यावरिल बॅच नंबर खोडलेला दिलुन मिळुन आला सदर बॉबी संत्रादेशी दारु जप्त करुन त्यापैकी सी.ए.तपासणी करित ९० मी.ली. च्या चापटी पावटी व एक देशी दारु टॉगोपंच ९० मीलीची पावटी वेगळे सी.ए. तपासणी करिता काढुन त्यावर फिर्यदीचे, पंचाचे सहीचे लेबर लावुन जागीच लाखेचे सिल करण्यात आले सदर आरोपीचे कृत्य कलम ६५(ई) म.दा.का. प्रमाणे होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल |
| ४ | बडनेरा | १६९/२३ कलम ६५(ई) महा.दा.का. | पाचबंगला, जुनी वस्ती, बडनेरा. | दि. २८.०२.२३ चे १८.०० वा. | दि. २८.०२.२३ चे २१.५२ वा. | सरतर्फे पोहेका शैलेश मोरे ब.नं.१०२९ पोस्टे बडनेरा अमरावती शहर | शेख चाँद शेख बशीर, वय ४७ वर्षे रा. पाचबंगला, जुनी वस्ती बडनेरा. | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादीने पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर प्रो. रेड केला असता त्याच्या ताब्यातुन अवैधरित्या विनापरवाना २० नग देशी दारूबाँबी संत्रा च्या प्रत्येकी १८० ml पावट्या, कि.अं. १४००/- रू चा मुद्देमाल मिळुन आला. वरून सदर आरोपीवर सदरचा गुन्हा दाखल |
| ६ | पोस्टेभा तकुली | 45/2023 कलम 65 (ई) म.दा.का. | पेढी नदी बांधा जवळ | 28/02/2023 चे 18.00 ते 18.30 | 28/02/2023 चे 19.11वा | सरतर्फे ना.पो. काँ. जगदिश | रोषन नारायणराव पवार वय 21 वर्ष रा. भातकुली | हकिकत अशा प्रकारे आहे की,नमुद घटना ता वेळी मिळालेल्या गोपनिय माहीती वरुन आरोपीवर पो.उपनि यांचेसह पोकाँ 989 सह प्रोव्ही रेड केला असता आरोपी जवळुन एका नाँयलाँन पिशवित 28 नग देशी दारु बाँबी संत्रा कंपनीच्या 180 एम.एल.च्या पावट्या किअं 2240/- रुचा माल मिळुन आला जप्ती पंचनाम्या |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | भातकुली | वादरम्याण | जता | शिरपुरे ब नं 1420 पोस्टेभा तकुली | | | प्रमाणे पंचासमक्ष मिळुन आल्याणे आरोपीचे कृत्य 65(ई) म.दा.का प्रमाणे होत असल्याणे सदरचा गुन्हा दाखल |